Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता (Intelligence) आणि त्यांचे समायोजन (Adjustment) एक सहसंबंधात्मक अध्ययन"

**डॉ. एस.आर. पाटील**
सहयोगी प्राध्यापक
पुंजाभाई पटेल शिक्षण महाद्यिालय, गोंदिया (महा)रा.तु.म. नागपुर विद्यापीठ, नागपुर

## प्रस्तावना

बुध्दि म्हणजे काय याचे उत्तर देणे जरी कठिण वाटले तरी बुध्दि असली तर काय घडण्याची शक्यता आहे याचा अचूक अंदाज बांधुन शास्त्रज्ञांनी बुध्दि मोजण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. घरामध्ये आपण वापरत असलेली विज जरी दिसत नसली तरी तिचे परिणाम दिसतात व तिचे मापनही केले जाते. त्याचप्रमाणे बुध्दिचेही आहे. कठिणपणा, गुंतागुंत, अमूर्तता, गती, समायोजन, समायोजक मूल्य व शोधक वृती या लक्षणांनी युक्त अशा कृतिंचे आव्हान स्विकारणे व सर्व शक्ती केंद्रित करून व भावनांच्या आहारी न जाता त्या आव्हानांना तोंड देणे हे बुध्दिचे कार्य आहे. व्यवहारामध्ये कोणतेही गुंतागुंतीचे काम व्यवस्थितपणे करण्यासाठी आपण हुशार व्यक्तीची निवड करतो, नाहीतर कार्यनाश होणे हे ठरलेलेच आहे शिकून सर्वांना सर्वच येईल असे नाही . या विधानाच्या मुळाशी असलेली कल्पना म्हणजे बुध्दि होय. समायोजन म्हणजेच सर्व आणि परिस्थिती यांच्यात सुसंवाद साधने आहे. समायोजनाचे सर्वसाधारणपणे तिन प्रकार पडतात. १.समुह समायोजन २. वैयक्तीक समायोजन ३. सामाजिक समायोजन अशाप्रकारे कोणतेही समायोजन हे त्या त्या व्यक्तीवरच अवलंबून असते. समायोजनावर अनेक घटक प्रभाव पडू शकतात. यामध्ये साधारणत: कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती, रूढी-परंपरा आर्थिक स्थिती तसेच अवतीभोवतीचे वातावरण या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या समायोजनावर होत असतो. शिक्षण म्हणजे वर्तनात घडूण येणारा बदल. प्रत्येक प्राणी येणा-या अनुभवानुसार आपल्या वर्तनामध्ये जो बदल करीत जातो त्याला शिक्षण असे म्हणतात. ही प्रविश्या मुल जन्माला आल्यापासुनच सुरू होते. आपल्या नैसर्गिक शक्तीनुसार ते धडपड करीत असते.

### बुध्दिमत्तेच्या व्याख्या (Definition of Intelligence) -

बुध्दिमापनाच्या क्षेत्रात ज्याने खुप मोठे कार्य केले आहे त्या आल्प्रेड बिने यांच्या मते "Intelligence is the tendency of thought to take and maintain definite direction, the capacity to make adoptation for the purpose of attaining a desired end and the power of self criticis" या व्याख्येमध्ये तिन भाग पडतात.

विशिष्ट दिशेने विचार करण्याची प्रवृत्ती

विशिष्ट उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी आवश्यक असणारी समायोजन क्षमता.

स्ववर्तनाची चिकित्सा करता येण्याची क्षमता.

### विल्यम जेम्सच्या मते :-

'Intelligence is the ability to adjust one self successfully to a relatively novel situation' या व्याख्येमध्ये अभिनव परिस्थिती व समायोजनक्षमता यावर अधिक भर दिलेला आहे. परंतु Successfully याचा अर्थ स्पष्ट होत नाही, कारण ही सापेक्ष अशी संज्ञा आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

### टर्मनच्या मते :-

"An individual is intelligent in proportion as the is above to carry an abstract thinking" या व्याख्येवरून अमूर्त विचार करण्याच्या क्षमतेलाच बुध्दिमान म्हणू इच्छीतो हे स्पष्ट होते. केवळ समायोजन करणे हे बुध्दिमान व्यक्तीचे काम नसून अमुर्त विचार करून आपल्याला पाहिजे तसा परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता त्यामध्ये असली पाहिजे.

### व्यक्तीमत्व विकासात बुध्दिमत्तेचे महत्व

### (Importance of Intelligence in Personality development)

व्यक्तिमत्वाचा विशेष अभ्यास करणा-या Allport यांच्या मतानुसार व्यक्तीमत्व म्हणजे स्वतः च्या परिसराशी वैशिष्टयपूर्ण समोयाजन होत असते.

### समायोजन, संकल्पना व स्वरूप :-

कोणत्याही प्रशिक्षणार्थ्यांला आपल्या व्यक्तिगत जीवनात कुटुंबामध्ये, समाजामध्ये तसेच शाळेमध्ये विविध अवस्थांमध्ये, परिस्थितीमध्ये अनेक वेळेस समायोजन करावे लागते . समायोजन म्हणजेच परिस्थितीशी जुळवूण घेणे होय.

### अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांत समायोजनाचे महत्व

### (Importance of Adjustment in Teacher Training School) :-

शिक्षण घेत असतांना अनेक संकटे आणि समस्या प्रशिक्षणार्थ्यांसमोर येत असतात. अशा सर्व परिस्थीतीमध्ये त्याला समायोजनाशिवाय कोणताही मार्ग अवलंबीता येत नाही आणि जर त्याने त्या परिस्थितीशी समायोजन साधले नाही तर याचा वाईट परिणाम होऊ शकतो. म्हणूनच अध्यापक विद्यालयामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना समायोजन करने अतिशय आवश्यक आहे. ज्यावेळी प्रशिक्षणार्थ्यांला परिस्थतीशी समायोजन करता येत नाही किंवा आपले इप्सीत पूर्ण करून घेता येत नाही. अशा वेळी प्रशिक्षणार्थ्यांला दु:ख होऊन प्रशिक्षणार्थी आत्मघातास प्रवृत्त होऊ शकतो. परंतु असे न व्हावे म्हणून प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांस संपूर्ण प्रशिक्षण कालावधी मध्ये समायोजन साधणे गरजेचे असते.

### संशोधन समस्या (Statement of the Problem) :-

"अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता (Intelligence) आणि त्यांचे समायोजन (Adjustment) एक सहसंबंधात्मक अध्ययन "

### पदाच्या संकल्पनात्मक व कार्यात्मक व्याख्या

### (Operational & Conditional Definitions) :-

### संकल्पनामक विश्लेषण

### बुध्दीमत्ता :-

"**डॉ. आर. के. टण्डन** पानी निर्मित व प्रमाणित केलेले सामुहिक मानसिक योग्यता परिक्षामध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी प्राप्त केलेल्या प्राप्तांकास प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता असे संबोधले आहे."

### समायोजन :-

"**डॉ. ए.के.पी. सिन्हा आणि डॉ. आर.पी. सिंग (पटना)** यांनी निर्मित व प्रमाणित केलेली अध्यापक विद्यालय समायोजन मापिकेमध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी प्राप्त केलेल्या प्राप्ताकांस प्रशिक्षणार्थ्यांचे समायोजन असे संबोधले आहे. "

### पदांच्या कार्यात्मक व्याख्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**अध्यापक विद्यालय :-** प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण देणारे विद्यालय महणजे अध्यापक विद्यालय होय.

**प्रशिक्षणार्थी :-** प्राथमिक व उच्चा प्राथमिक स्तरावरील शिक्षकांचे प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणता येईल.

**सहसंबंधात्मक अध्ययन :-** "प्रशिक्षणार्थीची बुध्दीमत्ता आणि त्यांचे समोयाजन यामधील आंतरसंबंधात्मक अध्ययनास सहसंबंधात्मक अध्ययन असे संबोधले आहे."

## व्याप्ती (Scope) :-

सदर संशोधन गोंदिया जिल्हयात राबविले जाणार असल्यामुळे सदर संशोधनाची व्याप्ती गोंदिया जिल्हयातील अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणापुरतीच आहे.

## परिमर्यादा (Delimitations) :-

सदर संशोधन गोंदिया जिल्हयातील अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधन अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणाच्या बुध्दिमत्तेच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधन अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या समायोजनाच्या अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.

सदर सशोधन अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणाच्या बुध्दिमत्ता आणि त्याचे समायोजन यांच्या सह संबंधातम्क अध्ययनपुरतेच मर्यादित आहे.

सदर संशोधन सत्र २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

## संशोधनाचे महत्व

एक सारखी बुध्दिमत्ता असणा-या प्रशिक्षणार्थ्यांचे समायोजन है साधरणतः एकाच प्रकारचे असते . वर्गातील हुशार, सामान्य व मंद बुध्दिच्या प्रशिक्षणार्थ्यांचे समायोजन हे कशा प्रकारचे असते व अध्यापक विद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दिमत्ता आणि त्यांचे विद्यालय समायोजन यामध्ये नेमका कोणता सहसंबंध आहे याद्दष्टिने सदर विषयावर संशोधन करण्याची आवश्यकता भासली म्हणून सदर विषय संशोधकाने निवडलेला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study):-

अध्यापक विद्यालयातील ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व समायोजन क्षमता यांचा सहसंबंध अभ्यासणे.

अध्यापक विद्यालयातील शहरी क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व समायोजन क्षमता याचा सहसंबंध अभ्यासणे.

## परिकल्पना :- (Hypothesis)

अध्यापक विद्यालयातील ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणीय फरक आढळून येत नाही.

अध्यापक विद्यालयातील शहरी क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणीय फरक आढळून येत नाही.

## संशोधनाची निगडित चले

स्वाश्रयी चल - अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी मुले व मुलीद्ध

आश्रयी चल - व्यक्तिमत्व आणि नेतृत्वगुण क्षमता

## जनसंख्या (Population)

सदर संशोधनामध्ये जी जनसंख्या घेतलेली आहे त्यामध्ये गोंदिया जिल्हयामधील दोन अध्यापक विद्यालयामधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## न्यादर्श : (Sample)

सदर संशोधनामध्ये न्यादर्श हा सुगम यादृच्छिक पध्दतीने घेण्यात आलेला आहे . यामध्ये गोंदिया जिल्हयातील अध्यापक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेणा-या ग्रामीण आणि शहरी प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश करण्यात आला.

सदर संशोधनामधील न्यादर्शाचा आकार व स्वरूप पुढील प्रमाणे आहे

## न्यादर्शाचा आकार व स्वरुप दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | विभाग | अध्यापक महाविद्यालयाचे नाव | स्त्री | पुरुष | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | शहरी | पी. पी. अध्यापक महा विद्यालय, गोंदिया | ७५ | ७५ | १५० |
| २. | ग्रामीण | दांडेगाव अध्यापक महाविद्यालय, दांडेगाव | ७५ | ७५ | १५० |
| | | एकुण | १५० | १५० | ३०० |

## संशोधन पध्दती (Method of Research)

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दती संशोधकाने निवडलेली आहे. या पध्दतीत सर्वेक्षण पध्दतीची सर्व वैशिष्टये स्पष्ट व ठळक स्वरूपात आढळतात. त्यात विद्यालयाशी संबंधीत असलेल्या विविध बाबीची सद्य: स्थिती, त्यातील आवश्यक बदल आणि त्याकरिता इष्ट असलेले उपाय यांचा सर्वेक्षणात्मक संशोधनाचा अंतर्भाव होतो.

## संशोधन साधने (Tools of Research):-

संशोधकाने माहितीचे संकलन करण्याकरिता **डॉ. ए.के.पी. सिन्हा आणि डॉ. आर. पी. सिंग (पटना)** यांनी प्रमाणित केलेली अध्यापक विद्यालय समायोजन शोधिका (High school Adjustment Inventory) व डॉ. आर के टण्डन यांनी प्रमाणित केलेली सामुहिक मानसिक योग्यता परिक्षण (Group Test of Intelligence) याप्रमाणे साधनांचा उपयोग केला आहे.

## माहिती संकलन (Data Collection) :-

कोणत्याही प्रकारचे संशोधन हाती घेतल्यावर त्यासाठी आपणास माहितीचे संकलन करावे लागते. ही माहिती आपण विविध प्रकारे संकलित करू शकतो. यासाठी अनेक संशोधन साधनाचा वापर आपण संशोधन समस्येनुसार करू शकतो. सदर संशोधनासाठी संशोधकाने वर उल्लेख केलेल्या साधनांचा उपयोग केला आहे. त्यासाठी सर्वप्रथम संशोधकाने आपल्या महाविद्यालयातुन डॉ. आर. के. टण्डन यांची बुध्दिमत्ता चाचणी आणि **डॉ. ए.के.पी. सिन्हा आणि डॉ. आर.पी. सिंग (पटना)** यांची समायोजन मापिका घेतली. त्यानंतर न्यादर्शात निवडण्यात आलेल्या अध्यापक विद्यालयांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि त्या अध्यापक विद्यालयांच्या प्राचार्यांची परवानगी घेतली. यानुसार निश्चित तारखा आणि त्या दिवशी संशोधकाने त्या त्या अध्यापक विद्यालयामध्ये जाऊन प्रश्नावलीचे वितरण केले आणि संपूर्ण भरलेले प्रश्नावल्या गोळा केलेत. अध्यापक विद्यालयामध्ये प्रश्नावलीचे वितरण करण्याआधी संशोधकाने प्रशिक्षणार्थ्यांना ज्या आवश्यक सुचना दयायच्या असतात त्या दिल्या. यामध्ये प्रश्नाचे उत्तर कसे दयायचे, उत्तर देतांना कोणती काळजी घ्यायची, प्रश्नपत्रिका किती वेळेमध्ये पूर्ण करावी, प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न सोडवावेत. प्रत्येक प्रश्नाला किती गुण आहेत तसेच मॅन्युअल मध्ये असलेल्या सुचनासुध्दा विद्यार्थ्यांना देण्यात आल्या. न्यादर्शामध्ये जेवढे प्रशिक्षणार्थी निवडण्यात आलेत त्यापेक्षा जवळपास १५-१५ प्रशिक्षणार्थी प्रत्यक्षात जास्त घेण्यात आलेत. सर्वप्रथम डॉ. आर. के. टण्डन यांची बुध्दिमत्ता चाचणी परिक्षण या प्रश्नावलीचे वितरण विद्यालयाच्या पहिल्याच तासिकेत आणि डॉ. ए.के.पी. सिन्हा व डॉ. आर.पी. सिंग यांची समायोजन मापिका विद्यालयाच्या पाचव्या तासिकेत वितरित करण्यात आल्यात. अशाप्रकारे दोन्ही प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकाचे संकलन करण्यात आले.

## परिकल्पनेचे सत्यापन / परिक्षण -

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**परिकल्पना क.१ -** अध्यापक विद्यालयातील ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दिमत्ता व त्याच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.

**सारणी क. १**

**ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दिमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमधील सहसंबंधाची सार्थकता दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | चले | गट | प्रशिक्षणार्थी संख्या(N ¨ | स्वाधिनता मात्रा df | r-मूल्य | सारणी मूल्य | | सार्थकता स्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ०.०१ | ०.०५ | |
| १ | बुध्दिमत्ता | ग्रामीण प्रशिक्षणार्थी | १५० | १४८ | ०.०३५ | ०. २०८ | ० .१५९ | सार्थक नाही |
| २ | समायोजन | | | | | | | |

**निरिक्षण :-**

**df = 148** करीता स्त्री प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दिमत्ता व त्यांच्या समायोजनामधील सहसंबंध सार्थक असण्याकरीता प्राप्त **r** मुल्य ०.०५ या स्तराची सारणी मुल्य व ०.०१ या स्तरावरील सारणी मुल्य एवढे किंवा त्यापेक्षा जास्त असावे लागते.

**r** मूल्याचे परिगणन केले असता ते ०.० ३५ असल्याचे दिसून येते. अर्थात ते कोष्टक मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणून ग्रामीण क्षेत्रातील प्रशिणार्थ्यांची बुध्दीमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेतील दोन चलातील ¨ सहसंबंध ०.०५ स्तरावर सार्थक नाही.

**स्पष्टीकरण :-**

**r** चे प्राप्त मूल्य ०.०१ व ०.०५ या दोन्ही स्तरावर सार्थक नसल्यामुळे उपरोक्त शून्य परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल.

**निष्कर्ष :-**

अध्यापक विद्यालयातील ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दिमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही.

**निष्कर्ष (Conclusion)**

अध्यापक विद्यालयातील ग्रामीण क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही. **r** = ०.१४२, ० .०५ तसेच ०.०१ स्तरावर सार्थक नाही. सारणी क्र.. १

अध्यापक विद्यालयातील शहरी क्षेत्रातील प्रशिक्षणार्थ्यांची बुध्दीमत्ता व त्यांच्या समायोजन क्षमतेमध्ये लक्षणिय सहसंबंध आढळून येत नाही. **r** = ०.०३५ , ०. ०५ तसेच ०.०१ स्तरावर सार्थक नाही. सारणी क्र. २

**सुचना :-**

सर्वप्रथम शिक्षकांनी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये कुठलाही भेदभाव न करता सर्व प्रशिक्षणार्थ्यांच्या समानतेची वागणूक दयावी .

जे प्रशिक्षणार्थी बुध्दीमत्ता चांगली नसल्यामुळे घाबरताना मागे राहतात स्वत: बदल नेहमी न्यूनगंडाची भावना ठेवतात अशा प्रशिक्षणार्थ्यांना कमी न लेखता त्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या मनावरील दडपण दूर करण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा. जेणे करून प्रशिक्षणार्थ्यांना सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन त्यांची समायोजन क्षमता वाढेल.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

Aggarwal, J.C. (1991), "Educational Research: An Introduction", New Delhi Arya Book Depot, 4th revised Edition.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

Best John W. (1996), "Research in Education", New Delhi, Prentice Hall of India Privaed Ltd. 7 Edition.

Buch, M.B. (1974), "A Survey of Research in Education", Baroda. Centre of Advanced Study in Education (C.A.S.E.) M.S. University of Baroda.

Buch, MB (2006), "Six Survey of Educational Research," Vol. I, (1993-2000), New Delhi NCERT.

Garrette, Henry E., (& Woodwarth, R.S.), (1973). "Statistics in Psychology and Education", Bombay, Vakils, Feffer and Simons Pvt. Ltd.

अहेर , हिरा १९९५ "उद्योन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक" नागपूर , श्री विद्या प्रकाशन

आफळे, रा.रा. व बापट, मा.वै. (१९९३) "शिक्षणाचे मानसशास्त्रीय अधिष्ठान" पुणे , श्री विद्याप्रकाशन

भांडारकर, के. एम. (२००७) "सुलभ शैक्षणिक सख्याशास्व" , बी ६ /१ रक्षालेखा सोसायटी, दत्तवाडी